MHKO180001102026

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, कुरुंदवाड यांचे न्यायालयात**

**संक्षिप्त फौजदारी केस क्र. ५९/२०२६**

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे प्रकरण १८ अन्वये आरोपीचे प्रतिकथन**

**(महाराष्ट्र सरकार वि. नयुम जाकीर तेरदाळे)**

**निशाणी क्र. ०३/ब**

गुन्हा घडल्याचा दिनांक – ३०.०९.२०२५

फिर्याद किंवा अहवाल दाखल दिनांक – ३०.०९.२०२५

फिर्यादीचे नाव व पत्ता – **महाराष्ट्र शासनातर्फे**
सहाय्यक पोलीस निरीक्षक,
कुरुंदवाड पोलीस ठाणे,

आरोपीचे नाव व पत्ता – **नयुम जाकीर तेरदाळे,**
वय – २१ वर्षे, धंदा – पानशॉप,
रा. हेरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.

**गुन्ह्याचा मजकूर –**

दिनांक ३०.०९.२०२५ रोजी ११.०० वाजेच्या सुमारास कुरुंदवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथील सिध्दार्थ चौक ते भगतसिंग तरुण मंडळ जाणा–या रस्त्यावर असले प्लेअर्स पान शॉपमध्ये तुम्ही आरोपी अवैध्यरित्या सुगंधी तंबाखू, सुगंधी सुपारी व वेगवेगळ्या पत्त्यांचे मिश्रण तयार करुन त्याचा मावा बनवून त्यावर कोणतेही लेबल न लावता अथवा त्याच्यावर सुरक्षेबाबत वैधानिक इशारा न लिहिता विक्री करीत असताना आढळून आलात म्हणून त्याद्वारे तुम्ही सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने नियंत्रण कायद्याचे कलम २० (२) अन्वये गुन्हा केलेला आहे.

**आरोपीचे प्रतिकथन –**

प्रश्न क्र.१ – तुम्हाला पोलीस कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र.२ – तुम्हाला आता न्यायालयाने वाचून व समाजावून सांगितलेला मजकूर समजला काय?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. ३ – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – होय, मला गुन्हा कबुल आहे.

समक्ष,

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.25 17:57:14 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

-------------

आरोपीची सही/अंगठा

**( बाळासाहेब श्री. गायकवाड )**

कुरुंदवाड. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

दिनांक २५.०३.२०२६ न्यायालय क्र.१, कुरुंदवाड

## <u>नि का ल प त्र</u>

आरोपीचे प्रतिकथन नोंदविले. त्याद्वारे त्याला त्याच्यावर लावण्यात आलेले आरोप मान्य व कबुल असल्याचे कथन केले आहे. आरोपीची आर्थीक परिस्थीती ही बेताची असून तो कुटूंबातील एकमेव कर्ता पुरुष आहे, त्यामुळे त्याला कमीत कमी दंडाची शिक्षा करण्यात यावी अशी त्याने विनंती केली. म्हणून, आरोपीच्या परिस्थितीचा आणि गुन्ह्याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>:: आ दे श ::</u>

| | |
|---|---|
| १} | आरोपी **नयुम जाकीर तेरदाळे** याला सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने नियंत्रण कायद्याचे कलम २०(२) या कलमाखाली शिक्षेस पात्र गुन्ह्याकरिता भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम २७५ प्रमाणे दोषी ठरविण्यात येते. |
| २} | आरोपीस सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने नियंत्रण कायद्याचे कलम २० (२) कलमाखाली शिक्षेस पात्र गुन्ह्याकरिता रक्कम रुपये **१,०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त)** इतक्या द्रव्यदंडाची आणि दंड न भरल्यास ०७ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते. |

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.25 17:57:27 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

**( बाळासाहेब श्री. गायकवाड )**

कुरुंदवाड. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

दिनांक २५.०३.२०२६ न्यायालय क्र.१, कुरुंदवाड